# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ / फाल्गुन २०, १९४३ ( शके )**

**(१) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**
**(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री**
**(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(७) परिवहन, संसदीय कार्ये मंत्री**
**(८) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३९**

---

### तेल्हारा (जि.अकोला) शहरात भेसळयुक्त खाद्य तेलाची विक्री होत असल्याबाबत

**(१) * ४२२४१ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हारा (जि.अकोला) येथील किराणा दुकानातून मोठया प्रमाणात भेसळयुक्त खाद्य तेलाची विक्री होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेल्हारा शहरातील बस स्थानक, जिजाऊ उद्यान, जुने शहर, संत तुकाराम चौक, अग्रसेन टॉवर चौक, माळेगाव नाका तसेच दुय्यम निबंधक कार्यालय येथे हातगाडयांवर व हॉटेलमध्ये भेसळयुक्त तेलाचा वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन त्यानुषंगाने अन्न व औषधे प्रशासनाकडून कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे खरे नाही.
(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना, कोल्हापूर तसेच मुंबईत शिधावाटप केंद्रावरील धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२) * ३९९६२ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयात अंत्योदय, अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र शिधापत्रिका धारकांना धान्य मिळत नसून शिधावाटप केंद्रावरील या धान्याचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच कोल्हापूर जिल्हयातील ३ लाख १६ हजार १९७ शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरे वसाहत (मुंबई) येथे एका गोदामावर छापा टाकून अवैधरित्या साठवलेला ३५ हजार किलो तांदूळ व ४५ हजार किलो गव्हाचा साठा माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान हस्तगत केला असून शिधावाटप केंद्रांमार्फत सदर धान्यसाठा अधिक दराने विकून धान्याचा काळाबाजार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त घटनांमध्ये पात्र रेशनकार्ड धारकांना धान्य पुरवठा होण्याबाबत तसेच धान्याचा काळाबाजार करणाऱ्या दुकानदारांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या शिधावाटप कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सहकार भांडार, युनिट क्र. २, आरे कोलनी, गोरेगांव पूर्व येथून अनधिकृतपणे साठा केलेला ३६,६५० किलो तांदुळ व ४५,००० किलो गहू पोलीसांनी जप्त केला आहे. सदर प्रकरणी संबंधितांवर आरे पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.६९/२०२१, दि.१८.१२.२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी पोलिसांमार्फत तपास सुरु आहे.
(४) पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र तसेच पोलिसांकडून चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इगतपूरी (जि. नाशिक) येथे ऑनलाईन शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (RCMS) स्प्लीट ऑप्शन उपलब्ध करून देण्याबाबत

**(३) * ४०६७६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपूरी (जि. नाशिक) तालुक्यातील गावपाडे व आदिवासी वस्तीतील सुमारे ३ हजार १७३ विभक्त कुटुंबांतील नागरिकांच्या शिधापत्रिकांचे फॉर्म नवीन डाटा एन्ट्री करण्यासाठी ऑनलाईन शिधापत्रिका प्रणालीमध्ये (RCMS) स्प्लीट हे ऑप्शन तहसिलदार, इगतपूरी (जि.नाशिक) यांच्याकडून तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे अशी मागणी समर्थन संस्थेने मा.अन्न व नागरीपुरवठा मंत्री, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्याकडे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय आहे,

(२) असल्यास, सदर आदिवासी ग्रामस्थांची गैरसोय टाळण्यासाठी शिधापत्रिकांचे प्रलंबित काम सुरू करण्यासाठी ऑनलाईन शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये स्प्लीट ऑप्शन उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ऑनलाईन शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (RCMS) स्प्लिट ऑप्शन हा पुर्वीपासुनच उपलब्ध असल्याने पुन्हा नव्याने कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील शिधावाटप दुकानदारांकडून लाभांर्थ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(४) * ४१८७९ श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती दिड किलो गहू व दोन किलो तांदूळ मोफत वाटप करण्याचा नियम असतांना सोलापूर शहरातील ऑनलाईन तपासणीत शिधावाटप दुकानदारांकडून लाभार्थ्यांना धान्याचे वाटप केल्याची नोंद करण्यात येत आहे, तथापि प्रत्यक्षात धान्याचे वाटप न करता लाभार्थ्यांची फसवणूक होत असून लाभार्थी धान्याच्या लाभापासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत शिधावाटप दुकानदारांना जिल्हा पुरवठा विभागाकडून धान्याचे वितरण करण्यात येऊनही लाभार्थ्यांना धान्याचे नियमित वाटप होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी संबंधित शिधावाटप दुकानदारांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधीत दुकानदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील रेशन प्रणालीतील दोष दुर करून पात्र लाभार्थ्यांना तातडीने धान्य वितरीत करण्याबाबत

**(५) * ४२२७३ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयात मागील ६ महिन्यांपासून रेशन प्रणालीचे लॉगीन बंद असल्यामुळे आधार कार्डशी जोडलेले पात्र लाभार्थी धान्यापासून वंचित असल्याची बाब दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि नागपूर जिल्हयातील रेशन प्रणालीतील दोष दूर करून पात्र लाभार्थ्यांना तातडीने धान्य वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा हप्ता मिळणेबाबत

**(६) * ३७८५७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक शिक्षक तसेच सर्व जिल्हयाचे शिक्षण उपसंचालक व जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी व अधिक्षक तसेच वेतन पथक

कर्मचाऱ्यांना शिक्षण संचालकांच्या दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रानुसार वेतनाच्या थकबाकीची रक्कम माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये नियमित देयकासोबत अदा करण्याच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना केल्या असून राज्यातील सन २०१६ पासून सेवा निवृत्त झालेल्या शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा पहिला हप्ता अद्यापि मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवृत्तीनंतर शासकीय वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचा लाभ मिळत नसल्याने शासनाने सेवानिवृत्त शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कुटुंबाच्या उदर निर्वाहासाठी सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याची थकबाकीची रक्कम एकत्रीतपणे निवृत्तीवेतनधारकाच्या बँकखात्यात तातडीने जमा करण्याची व्यवस्था करावी अशी मागणी टीचर्स डेमोक्रेटिक फ्रंटचे उपाध्यक्ष श्री. राजेश पंड्या यांनी शिक्षणमंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मा.उपमुख्यमंत्री, मा.मुख्यमंत्री आदींकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(३) तसेच सोलापूर जिल्हयातील सेवानिवृत्त शिक्षकांनाही दरमहा निवृत्तीवेतन वेळेवर मिळत नसल्याने त्यांचे दैनंदिन जीवन जगणे हलाखीचे झाले आहे तसेच विधवा परितक्त्या यांना उदरनिर्वाहासाठी मिळणारे कुटुंब निवृत्तीवेतन वेळेवर मिळत नसल्याची सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षण आयुक्त यांचेमार्फत शासनाकडे निवृत्ती वेतनाकरीता आर्थिक तरतूद करण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी व कुटुंबनिवृत्तीवेतन वेळेत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) सदर निवेदने प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, २०२२ चे निवृत्ती वेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन अदा करण्यात आले असून माहे फेब्रुवारी, २०२२ चे निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन अनुदान संचालक स्तरावरुन वितरीत करण्यात

आली आहे. तसेच सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रत्येक महिन्यांकरिता वेतनासाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. सबब काही जिल्हयांमध्ये सातव्या वेतन आयोगाचा पहिला हप्ता अदा करण्यात आलेला नाही. आता निधीच्या उपलब्धतेनुसार सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) तालुक्यातील बागेवाडी येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(७) * ४००३६ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील बागेवाडी येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाची चौकशी करण्याकरिता जत पंचायत समितीसमोर स्थानिक लोकप्रतिनिधींनी आमरण उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) स्थानिक नागरीक श्री. राजाराम केंचाणा व्हनमाने यांनी योजनेच्या चौकशीकरिता दिनांक ११.०१.२०२२ रोजी आमरण उपोषण केले होते. त्यांना ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जत कार्यालयाकडून योजनेची पूर्ण माहिती दिली. तद्नंतर त्यांनी दिनांक १३.०१.२०२२ रोजी उपोषण सोडले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## भोर तालुक्यातील वेळवडा खोरेतील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक नसल्याबाबत

**(८) * ३९५४० श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर तालुक्यातील वेळवडा खोरेतील २१ प्राथमिक शाळांना मागील तीन वर्षात पदवीधर शिक्षक मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्याअनुषंगाने चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, पदवीधर शिक्षकांच्या जागा भरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२), (३) व (४) भोर विकास गटातील वेळवंड खोऱ्यामध्ये एकुण २१ शाळा असून एकूण पटसंख्येनुसार उपशिक्षकांची ४२ पदे मंजुर आहेत. सदरची सर्व पदे भरलेली आहेत. तसेच पदवीधर शिक्षकांची ४१ पदे मंजुर असून त्यापैकी २३ पदे भरलेली आहेत. पदवीधर शिक्षकांची पदे रिक्त असली तरी त्या शाळांमध्ये उपशिक्षक कार्यरत होते. गेल्या २ वर्षापासून कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शाळांमधून ऑनलाईन अभ्यासक्रम घेण्यात येत होता. शिक्षणापासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दि.१३.१०.२०१६ च्या शासन निर्णयानुसार पदवीप्राप्त शिक्षकांना पदवीधर पदी वेतनोत्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील अंबा नदीचे पाणी प्रदुषित झाल्याबाबत

**(९) * ३७७१३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर, सुधागड, रोहा, अलिबाग आणि पेण अशा पांच तालुक्यातून (जि.रायगड) वाहणाऱ्या अंबा नदीचे पाणी रासायनीक कारखान्यांतून सोडण्यात

येणारे दुषित पाणी, सांडपाणी तसेच नदीतील पाण्यावर हिरवळ तयार झाल्याने नदीचे पाणी प्रदुषीत झाल्याने ग्रामस्थांना अनेक प्रकारचे आजार व रोगराई पसरत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी गट विकास अधिकाऱ्यांकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबा नदीचे पाणी प्रदुषण मुक्त करुन ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे : (१**) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाबळेवाडी (ता.शिरुर, जि.पुणे) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१०) * ४२१२४ श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील वाबळेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांकडून शाळेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शाळा सुधार निधीच्या नावाखाली देणगी जमा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शाळा पूर्व वर्ग (बालवाडी) सुरु करण्याबाबत या शाळेने परवानगी घेतली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गटविकास अधिकारी, शिरुर यांनी शाळेची प्राथमिक चौकशी सुरु केल्यानंतर शाळेला पालकांनी दिलेल्या देणगीची रक्कम त्यांना परत केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाबळेवाडी या शाळेतील इयत्ता आठवीपर्यंतच्या वर्गांना मान्यता असताना शाळेतील इयत्ता नववी व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची कागदोपत्री नोंद कासारी येथील माध्यमिक विद्यालयात करुन प्रत्यक्षात वाबळेवाडी शाळेतच त्यांचे अध्यापन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत जिल्हा परिषद पुणे यांनी नेमलेल्या चौकशी समितीने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे व याबाबतचा सविस्तर तपशील काय आहे,
(६) तसेच शाळा सुधार निधीच्या नावाखाली कंपन्या, विद्यार्थी, विविध सेवाभावी व स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडून किती रक्कम आजपर्यंत देणगी स्वरुपात प्राप्त झाली आहे तसेच सदर देणगीचा विनियोग कसा करण्यात आला याबाबतची सविस्तर माहिती मिळण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे. लोकसहभागातून शाळेकरिता भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम शाळेने राबविला होता. त्याचाच भाग म्हणून "शाळा सुधार" निधीच्या नावावर रक्कम जमा केली होती. मात्र ती रक्कम नंतर परत करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) श्री. दत्तात्रय बबनराव वारे, तत्कालीन उपशिक्षक तथा प्रभारी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा वाबळेवाडी, यांना दि. २२.११.२०२१ रोजी निलंबित करण्यात आले होते. त्यांच्याविरुध्द सहाय्यक आयुक्त (चौकशी) पुणे विभाग, पुणे यांचेकडे खातेनिहाय चौकशी सुरु आहे. दरम्यान श्री. वारे, उपशिक्षक यांना दि. १०.२.२०२२ रोजी जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्यात आले आहे.
(६) जिल्हा स्तरीय उच्च अधिकारी समितीने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने चौकशी समितीच्या दि.०९/०९/२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त चौकशी अहवालामधील निष्कर्षानुसार जि. प. शाळा वाबळेवाडी येथे शालेय कामकाजामध्ये अनियमितता झालेली असल्याने त्या बाबत सखोल लेखा परिक्षण करावे असे चौकशी समितीने अभिप्राय नमूद केलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

----------------

## राज्य परिवहन विभागातील तत्कालीन नियंत्रक यांनी राज्य अतिथींना पुरविण्यात येणाऱ्या डी.व्ही.कार वाहनांप्रकरणी गैरव्यवहार केल्याबाबत

**(११) * ३८४४४ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **राजशिष्टाचार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या दौ-यावर येणा-या अति महत्वाच्या राज्य अतिथींसाठी वापरण्यात येणा-या शासकीय मोटारी सुरक्षित नसल्याची माहिती माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन विभागातील तत्कालीन नियंत्रक, श्री.किशोर गायकर, शासकीय परिवहन सेवा (जीटीएस) यांनी दिनांक ०५ मे, २०१९ ते माहे डिसेंबर, २०२१ या त्यांच्या सेवा कालावधीत राज्य अतिथींना पुरविण्यात येणाऱ्या डी.व्ही.कार वाहनांमध्ये गैरकारभार केल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुरुस्तीच्या नावाखाली या मोटारींमध्ये नव्याऐवजी जुनेच सुटे भाग वापरण्यात येऊन लाखो रुपयांचा अपहार केला असल्याचे आरोप जीटीएस वाहन-चालक संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने श्री. गायकर, तत्कालिन नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांचेविरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येऊन वाहनांमध्ये दुरुस्तीच्यावेळी नव्या ऐवजी जुनेच सुट्टे भाग वापरल्याच्या आरोपासंदर्भात प्राथमिक तांत्रिक तपासणी करण्याकरिता मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांची दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबतचा प्राथमिक तांत्रिक तपासणी अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) जी.टी.एस. वाहन चालक संघटनेने दि.२४.११.२०२१ रोजी मा. उपमुख्यमंत्री यांना दिलेले निवेदन वजा तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालिन संचालक, शासकीय परिवहन सेवा तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांनी प्राथमिक चौकशी केली. सदर प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने श्री. गायकर, तत्कालिन नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांचेविरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

तसेच श्री.गायकर, तत्कालिन नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांचेवर करण्यात आलेल्या तांत्रिक स्वरुपातील आरोपासंदर्भात प्राथमिक तांत्रिक चौकशी करण्याकरिता मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांची दि.२१.०१.२०२२ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. प्राथमिक तांत्रिक चौकशी प्रक्रिया सुरु आहे.

(५) हे खरे आहे. सदर प्रकरणी प्राथमिक तांत्रिक चौकशी प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिकमधील शेंद्रीपाडा-खरशेत येथे नळाद्वारे कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१२) * ३७८१८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मधील शेंद्रीपाडा-खरशेत येथील आदिवासी महिलांना जीव धोक्यात घालून नदीवर टाकलेल्या सागाच्या लाकडावरुन नदी पार करुन पाणी आणावे लागत असल्याने मा.पर्यावरण मंत्री यांनी आदेश दिल्यानंतर जिल्हापरिषदेने लोखंडी पूल तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांची पाण्यासाठी होणारी वणवण कायमस्वरुपी थांबावी याकरिता या वस्तीतील सर्व आदिवासी घरांना नळाव्दारे पाणी पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नळ पाणी पुरवठा योजनेचे काम लवकर पुर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०३.०१.२०२२ रोजी सकाळ वर्तमानपत्रात "पाण्यासाठी जीवघेणी कसरत" अशी बातमी आल्यानंतर त्याच दिवशी ग्रामपंचायत खरशेत यांना तात्काळ उपाययोजना करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते व ग्रामपंचायतीने ३२ फुट लांब, ४ फुट रुंद व ३ फुट रेलिंग असलेला लोखंडी पुल दिनांक ०८.०१.२०२२ रोजी स्थापित केला आहे. तसेच याबाबत मा. मंत्री, पर्यावरण यांनीही सूचना दिल्या होत्या.

(२) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत शेंद्रीपाडा ग्रामपंचायत खरशेत येथे सार्वजनिक विहीर आहे. महिलांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवावी याकरिता जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचेमार्फत सर्व आदिवासी घरांना नळाद्वारे पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे.

(३) शेंद्रीपाडा, ग्रामपंचायत खरशेत व सावरपाडा, ग्रामपंचायत खरशेत या गावांची पाणी पुरवठा योजना निविदा कार्यवाही पूर्ण झालेली असून, लवकरच कार्यादेश देऊन योजनेची कामे सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) येथील कोळसा खाणीमुळे प्रदुषणात वाढ झाल्याबाबत

**(१३) * ४२३२१ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) येथे अनेक कोळसा खाणी असल्याने मोठया प्रमाणात प्रदुषणात वाढ होऊन कोल डेपो, व खाण बाधित क्षेत्रामध्ये प्रदुषित वायु, धुलीकण व जलप्रदुषणामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रदुषण दुर करण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून वणी तालुक्यातील कोळसा खाणीची नियमित पाहणी करण्यात येते. पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. कोळसा हाताळणी प्रकल्पाअंतर्गत मुंगाली खुली खाण, कोलारपिंपरी खुली खाण व निलजय खुली खाण या कोळसा खाणीना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि. ०४/०२/२०१९ व दि.११/०३/२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आले आहेत. तसेच पाहणीदरम्यान निदेर्शनास आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने कोळसा हाताळणी प्रकल्प लिमिटेड रेल्वे सायडींगला दि. ०६/११/२०१९ रोजी अंतरिम निर्देश पारित करुन रु. २.५ लक्षची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मुंगाली खुली खाण, व कोळसा हाताळणी प्रकल्प लिमिटेड घोन्सा खुली खाणीची अनुक्रमे रु. १०.० लक्ष व रु. ५.० लक्षची बँक हमी माहे जानेवारी २०२२ मध्ये जप्त करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## माहुल (मुंबई) येथील प्रदुषणामुळे त्रस्त नागरीकांचे स्थलांतर करण्याबाबत

**(१४) * ४०९५७ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहुल (मुंबई) येथे आरोग्याला घातक असलेल्या प्रदुषणामुळे नागरीक त्रस्त असून संबंधित नागरिकांचे कुर्ला येथे एचडीआयएल या विकासकाने बांधलेल्या इमारतीमध्ये स्थलांतर करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती मेधा पाटकर यांनी शासनाकडे केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महानगरपालिका, एमएमआरडीए, म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यामध्ये नियोजन करुन कोणत्याप्रकारे घरे उपलब्ध करुन देता येतील याबाबत दोन ते तीन दिवसात ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आश्वासनास १ महिन्याचा कालावधी होऊनही अद्याप निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) माहुल एव्हरस्माईल लेआऊटमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुनर्वसन केलेल्या लोकांना प्रदुषणाचा त्रास असल्याच्या तक्रारी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती मेधा पाटकर यांनी केल्या आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच माहुल येथील एव्हरस्माईल पीएपी संकुल येथे राहत असलेल्या प्रकल्पबाधितांचे कुर्ला येथे एच.डी.आय.एल. बिल्डरने बांधलेल्या इमारतीमध्ये स्थलांतर करण्याच्या मागणीबाबत श्रीमती मेधा पाटकर यांचेसमवेत दिनांक २१.१२.२०२१ रोजी संयुक्त बैठक झाली होती.

(२), (३) व (४) दिनांक २१.१२.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यात आलेल्या कुर्ला प्रिमिअर येथील मे. एच.डी.आय.एल. च्या सदनिकांपैकी १५०० ते १६०० सदनिका माहूल येथील पुनर्वसित प्रकल्पग्रस्तांना तात्पुरत्या स्वरुपात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हस्तांतरीत कराव्यात असे निदेश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना देण्यात आले होते. सदर निदेशाच्या अनुषंगाने कुर्ला प्रिमिअरमधील १६०० सदनिका तात्पुरत्या स्वरुपात बृहन्मुंबई महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्याबाबत महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिनांक २८.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस सदर सदनिका प्राप्त झाल्यानंतर, महानगरपालिकेमार्फत माहूल येथील पुनर्वसित प्रकल्पबाधितांना उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील पाण्याच्या स्त्रोतात फ्लोराईड व नायट्रेटचे अधिक प्रमाण आढळून आल्याबाबत

**(१५) * ४०७२६ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात ९४ गावातील १३२ स्त्रोत फ्लोराईडबाधित असून २४५ गावातील ४८४ स्त्रोतात अधिकचे नायट्रेट असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील २२७३ गावातील १०६८९ जलस्त्रोतांचे नमूने तपासणीसाठी घेतले असता त्यापैकी तपासणी केलेल्या ६६४७ नमून्यांपैकी ८७६ नमूने अयोग्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील १४३३ गावातील ४९०५ पैकी तीन स्त्रोतांमध्ये टी.डी.एस.चे प्रमाण अधिक तर ९४ गावातील १३२ स्त्रोतांमध्ये १.५ पी.पी.एम. पेक्षा फ्लोराईडचे प्रमाण अधिक आढळल्याने आरोग्याच्या दृष्टीने हे प्रमाण अधिक घातक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हयातील २४५ गावात ४८४ स्त्रोत नायट्रेटबाधित आढळून आले तर ६५४ गावातील १६२५ स्त्रोतांमध्ये १ ते १.५ पी.पी.एम. पर्यंत फ्लोराईड आढळले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हयातील १०६ गावातील १२५ स्त्रोतांमध्ये ६.५ ते ८.५ मर्यादेत पी.एच. (सामू) अधिक १२१ गावातील १८० जलस्त्रोतांमध्ये टि.एच. तसेच १६ गावातील १६ जलस्त्रोतांमध्ये अल्कनिटीचे प्रमाण अधिक आढळले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, फ्लोराईडबाधित गावातील नागरिकांना शुध्द पिण्याचे पाणी मिळण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) सन २०२०-२१ मान्सूनपूर्व रासायनिक पाणी नमुने तपासणी अंतर्गत एकूण ६६४७ पाणी नमुन्यांपैकी ९२ गावातील १२९ स्त्रोत फ्लोराईडबाधित आढळून आले आहेत. तसेच ६५४ गावातील १६२५ पाणी नमुन्यांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण १.५ पी.पी.एम या मर्यादेमध्ये आढळून आले आहे. नायट्रेटचे प्रमाण २४५ गावातील ४८४ स्त्रोतात BEREAU OF INDIAN STANDARDS यांनी ठरवून दिलेल्या मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.

(२) हे खरे आहे.

सन २०२०-२१ मान्सूनपूर्व रासायनिक पाणी नमुने तपासणी अंतर्गत २२७३ गावातील १०६८९ स्त्रोतांपैकी ६६४७ पाणी नमुन्याची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ५७७१ पाणी नमुन्यातील रासायनिक घटकाचे प्रमाण BEREAU OF INDIAN STANDARDS यांनी ठरवून दिलेल्या मानकांच्या मर्यादेत आहे, तर ८७६ पाणी नमुन्यामधील रासायनिक घटकाचे प्रमाण BEREAU OF INDIAN STANDARDS यांनी ठरवून दिलेल्या मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.

(३) सन २०२०-२१ मान्सूनपूर्व रासायनिक पाणी नमुने तपासणी अंतर्गत एकूण ६६४७ पाणी नमुन्यांपैकी ०३ गावातील ०३ पाणी नमुन्यांमध्ये टी.डी.एस.चे प्रमाण BEREAU OF INDIAN STANDARDS यांनी ठरवून दिलेल्या मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. तसेच ९२ गावातील १२९ पाणी नमुन्यामध्ये फ्लोराईडचे प्रमाण १.५ पी.पी.एम.पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.

(४) हे खरे आहे.

सन २०२०-२१ मान्सूनपूर्व रासायनिक पाणी नमुने तपासणी अंतर्गत एकूण ६६४७ पाणी नमुन्यांपैकी २४५ गावातील ४८४ स्त्रोतांमध्ये नायट्रेटचे प्रमाण BEREAU OF INDIAN STANDARDS यांनी ठरवून दिलेल्या मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. ६५४ गावातील १६२५ पाणी नमुन्यांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण १ ते १.५ पी.पी.एम.या मर्यादेमध्ये असल्याचे आढळून आले आहे.

(५) हे खरे आहे.

१०६ गावातील १२५ पाणी नमुन्यांमध्ये पी.एच.चे प्रमाण ६.५-८.५ या मर्यादेपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले आहे. तसेच १२१ गावातील १८० जल स्त्रोतामध्ये टोटल हार्डनेसचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. तसेच,१६ गावातील १६ पाणी नमुन्यामध्ये अलक्यालिनिटीचे प्रमाण BEREAU OF INDIAN STANDARDS यांनी ठरवून दिलेल्या मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले असले तरी ग्राहय मर्यादेत असल्याने ते शरीरास अपायकारक नाही.

(६) जिल्हयात पाणी गुणवत्ता बाधित स्त्रोत असलेल्या गावांमध्ये नियमित पाणी शुध्दीकरणाबाबत तसेच फ्लोराईडचे प्रमाण (१-१.५ ppm) या मर्यादेच्या वर असल्यास बाधित स्त्रोतांना लाल रंग देवून पाणी वापरण्यास बंदी करण्याबाबतचे निर्देश गट विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यांना वेळोवेळी जिल्हा स्तरावरून देण्यात आलेले आहेत व संबंधित यंत्रणामार्फत सदर निर्देशास अनुसरून कार्यवाही करण्यात आलेली आहे. पाणी गुणवत्ता बाधित गावांत पर्यायी स्त्रोत उपलब्ध असून त्यांचा वापर करण्यात येत आहे.

-----------------

## मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प राबविण्याबाबत

**(१६) * ४११९२ श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयासह मराठवाडयातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाची संकल्पना पुढे आलेली असून या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यास शासनाने तत्वत: मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मंजुरी दिली असल्यास या प्रकल्पाच्या माध्यमातून लातूर जिल्हयास उजनी किंवा जायकवाडीचे पाणी मिळणार याबाबत स्पष्टता करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तत्वत: मंजुरी दिलेल्या प्रकल्पातून पाणी देण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून व लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

लातूर शहर व जिल्हा हा गोदावरी खोऱ्यात येत असल्याने व उजनी प्रकल्प कृष्णा खोऱ्यात असल्याने कायदेशीर बाबी पहाता, औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर व पैठण या तालुक्यांना तसेच बीड व लातूर संपूर्ण जिल्ह्यांसाठी जायकवाडी, माजलगाव, मांजरा, उर्ध्व मनार धरणातून ग्रीड प्रस्तावित करणे, उस्मानाबाद जिल्ह्यासाठी उजनी, सिना कोळेगांव, निम्न तेरना धरणातून ग्रीड प्रस्तावित करणे याबाबत उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये स्पष्टता करण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) दिनांक २३.०६.२०२१ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये पहिल्या टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ग्रीडच्या प्रस्तावास जल जीवन मिशनमधून घेण्यास मान्यता देण्यात आली. त्या अनुषंगाने दिनांक ०४ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत १७८ गावे पैठण (तालुका-पैठण व औरंगाबाद, जि-औरंगाबाद) या ३०७.६५ कोटी इतक्या किंमतीच्या ग्रीड पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पुढील टप्प्यात गंगापूर, वैजापूर व त्यानंतरच्या टप्प्यात बीड, उस्मानाबाद, लातूर ग्रीडची कामे पाणी उपलब्धता व निधीची उपलब्धतेनुसार घेण्याबाबत मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात बेकायदा गुटखा आणि मावा निर्मिती होऊन विक्री होत असल्याबाबत

**(१७) * ३९७२२ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी, शेवगांव, नेवासा, संगमनेर या ठिकाणी गुटखा व मावा निर्मिती व विक्रीकर बंदी असूनही मोठया प्रमाणात बेकायदा निर्मिती व विक्री होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी मावा व गुटख्याचे मोठे उत्पादन व विक्री केंद्र असून राज्यभर येथून मावा व गुटखा पुरविला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीर गुटखा व मावा उत्पादन तसेच विक्री याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे अंशत: खरे आहे.

गुटखा, मावा, सुगंधीत सुपारी व तत्सम अन्नपदार्थांच्या उत्पादन व विक्रीस प्रतिबंध असला तरी चोरीछुप्या मार्गाने या प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री केली जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. राज्यात सन २०२१-२२ मध्ये गुटखानिर्मीती होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या अहमदनगर जिल्हा कार्यालयाने शेवगाव, नेवासा, पाथर्डी व संगमनेर या तालुक्यांत सन २०२०-२०२१ या कालावधीत १० ठिकाणी छापे टाकुन प्रतिबंधित अन्न पदार्थ (गुटखा, पानमसाला इ.) चा ८८६६ पॅकेट, ४०९ किग्रॅ मावा, किंमत रु. ११,०५,८४१/- एवढ्या किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केलेला आहे. त्याअनुषंगे संबंधितांविरुध्द पोलीसांकडे १० फिर्याद (FIR क्र. १८७/२०२०, २४/२०२१, ५५४/२०२१, ९९/२०२०, २४५/२०२०, २३१/२०२०, ९६१/२०२०, ११६/२०२१, १२३/२०२१, २०५/२०२०) दाखल करण्यात आले आहेत व सर्व प्रकरणांत मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच माहे एप्रिल २०२१ ते २२ फेब्रुवारी २०२२ कालावधीत शेवगाव, नेवासा, पाथर्डी व संगमनेर या तालुक्यांत ०४ ठिकाणी छापे टाकुन एकूण साठा २३५२ पॅकेट, १२ किलो सुपारी व सुगंधित तंबाखु किंमत रु. १,२२,८७३/- एवढ्या किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केलेला आहे. त्याअनुषंगे संबंधितांविरुध्द पोलीसांकडे ०४ फिर्याद (FIR क्र. ३१२/२०२०, ३/२०२२, ४/२०२२, ५/२०२२) दाखल करण्यात आले असून सर्व प्रकरणांत मा.न्यायालयात खटले दाखल करण्याची कार्यवाही घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील बहुतांश खाजगी शाळा अतिरिक्त शुल्क आकारीत असल्याबाबत

**(१८) * ३८२२८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील बहुतांश खाजगी शाळा नियमांचे उल्लंघन करुन शाळेच्या शैक्षणिक शुल्कात (Fee) १५ टक्के सुट असतानाही शुल्क कमी करीत नसल्याने पालकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश शाळांमार्फत ऑनलाईन फी सोबत इतर उपक्रमाच्या शुल्काचाही शैक्षणिक शुल्कामध्ये समावेश केला असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांनी सदरहू शुल्क भरण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुक्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बहुतांश शाळेतून शासनाच्या नियमांचे उल्लंघन होत असून कोरोना महामारीच्या काळात पालकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळेच्या शैक्षणिक शुल्कात १५ टक्के सुट देण्याच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) ज्या शाळांनी १५ टक्के शुल्क कपातीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी केली नाही अशा शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / (माध्यमिक) यांचे स्तरावरुन नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील शैक्षणिक संस्थांना शासन स्तरावर अल्पसंख्याक दर्जा देण्यात येत असल्याबाबत

**(१९) * ४२२५९ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील जगदंब विणकर शिक्षण संस्था व अन्य सर्वसाधारण शैक्षणिक संस्था निकषात बसत नसतांनाही त्यांना अल्पसख्यांक संस्थांचा दर्जा परस्पर शासन स्तरावर देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे कोणतीच नोंद नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर अशा संस्थांचा अल्पसंख्यांक दर्जा रद्द करण्यात आला, असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संस्थांना दर्जा दिल्याबाबतचे व दर्जा काढून घेतल्याबाबतचे आदेश नागरिकांना उपलब्ध करून देण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती उपरोक्त आदेश नागरिकांना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक :** (१) नाही.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे. सदर संस्थेने स्वत: केलेल्या विनंती अर्जास अनुसरुन शासन निर्णय, दिनांक २७.०५.२०१३ च्या भाग २ मधील अ. क्र. ७ (५) मधील तरतुदीनुसार सदर संस्थेचा अल्पसंख्याक दर्जा रद्द करण्यात आलेला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) माहिती अधिकार कायद्यांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जास अनुसरुन संबंधित अर्जदाराला आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सोनीमोहा (ता.धारूर, जि.बीड) येथील किराणा दुकानात बेकायदेशीर पेट्रोल व गुटखा विक्री होत असल्याबाबत

**(२०) * ३९७४१ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सोनीमोहा (ता.धारूर,जि.बीड) येथील जगदंबा देवी मंदिर परिसरातील किराणा दुकानातून श्री. गिरी हे मागील दोन वर्षापासून अवैध पेट्रोल व गुटखा विक्री करीत असल्याचे माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किराणा दुकानातून पेट्रोल व गुटखा विक्री ही बेकायदेशीर असूनही याची विक्री गत दोन वर्षापासून सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलीस प्रशासन व तहसिलदार यांच्याकडे तक्रार करूनही त्यावर कोणतीच कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त किराणा दुकानाची तातडीने चौकशी करून संबंधीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) तहसीलदार, ता.धारुर, जि.बीड यांच्या अहवालानुसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजे सोनीमोहा, ता.धारूर (जि.बीड) या गावातील जगदंबा देवी मंदिर परिसरात मंडळ अधिकारी व तलाठी यांनी पंचासमक्ष स्थळपाहणी करुन चौकशी केली असता, तसेच सहायक पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, धारुर यांनी सदर ठिकाणी पंचासमक्ष झडती घेतली असता, किराणा दुकानातून अवैध पेट्रोल व गुटखा विक्री होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहा (जि.रायगड) येथील धाटाव नदीपात्रात मासे मृतावस्थेत आढळून आल्याबाबत

**(२१) * ३८०६८ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) येथील धाटाव नदीपात्रात मोठया प्रमाणात मासे मृतावस्थेत आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसी परिसरातील अनेक कंपन्या रसायनयुक्त पाणी नदीत सोडत असल्याने रासायनिक पाण्यामुळे नदीचे पाणी प्रदुषित होऊन नदीच्या काठावर हजारो मृत माशांचा खच पडला असल्याने स्थानिक मच्छिमार व ग्रामस्थांनी सदर कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार नदीत रासायनिक पाणी सोडणा-या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही. माहे जानेवारी, २०२२ मध्ये धाटाव नदीपात्रात मासे मृत झाल्याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यावली (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील पाणी पुरवठा योजनेबाबत

**(२२) * ४२२६५ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावली (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील पाणी पुरवठा योजना, विहिरीचे बांधकाम तसेच पाईप लाईन टाकण्याची कामे होऊन एक वर्षाचा कालावधी उलटला तरीही गावामध्ये अद्यापपर्यंत पाणी पुरवठा सुरू करण्यात आला नसल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठा योग्य प्रमाणात व सुरक्षित सुरु करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याने शासनाने त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विज जोडणी अभावी योजनेचा पाणी पुरवठा सुरु होऊ शकला नाही. विज जोडणी करीता ग्राम पंचायतीने विज जोडणीस्तव सुमारे दोन ते तीन महिन्यापूर्वी A-१ फॉर्म भरलेला आहे. परंतु ग्रामपंचायतीकडे विद्युत देयकाची थकबाकी सुमारे रु. १,२०,११०/- असल्याने अद्यापपर्यंत विज वितरण कंपनीने नविन जोडणी करीता भरणा आदेश (Demand Note) दिलेला नाही. त्यामुळे सदर योजनेची कामे पुर्ण होउनही पाणी पुरवठा सुरु करण्यास विलंब होत आहे.

-----------------

## अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मार्फत वाटप होत असलेल्या तिर्थक्षेत्र विकास निधीत दुजाभाव होत असल्याबाबत

**(२३) * ३८२०८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेमार्फत वाटप होत असलेल्या तिर्थक्षेत्र विकास कामांसाठी प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांपैकी पारनेर, नगर, शेवगाव व नेवासा याच तालुक्यांना कोटयवधी रुपयांची कामे मंजूर झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात सुमारे १७३ क वर्ग तीर्थक्षेत्र असून, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम २०२१-२०२२ अंतर्गत अनेक कामांना ७ कोटी ४१ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली असून देखील त्यापैकी पारनेर तालुक्यात सर्वाधिक २६ तीर्थक्षेत्रांच्या कामांना तब्बल ३ कोटी ४१ लाख, नगर तालुक्यांत ११ कामांना १ कोटी ३४ लाख, शेवगाव तालुक्यातील ९ कामांसाठी १ कोटी १९ लाख रुपयांचे नियोजन करण्यात आले आहे, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तीर्थक्षेत्र विकास कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेल्या निधीचे गुणवत्तेनुसार समप्रमाणात वाटप होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशी अहवालानुसार तीर्थक्षेत्र विकास कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेल्या निधीचा सर्व तीर्थक्षेत्रांना लाभ मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत “क” वर्ग दर्जा प्राप्त तिर्थक्षेत्रांची संख्या वाढत असून मागणीच्या प्रमाणात निधी उपलब्ध होत नाही. नियोजन विभागाच्या दि. १७.१२.२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाकडील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना आहेत. सदर कामांची निवड जिल्हा परिषदेकडून केली जाते व वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून निवड केलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषदेकडून देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जयसिंगपूर विकास सोसायटीच्या (जि.कोल्हापूर) शिधावाटप दुकानांतून रेशन धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२४) * ४१७१० श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयसिंगपूर विकास सोसायटीच्या (जि.कोल्हापूर) शिधावाटप दुकानांमधून बोलेरो गाडीतून रेशन धान्य विक्रीसाठी नेले असताना दुकानदार व चालकांना परिवर्तन संघटनेने दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन चालकाने अन्य धान्य दिनांक ०५ जानेवारी, २०२२ रोजीच्या सुमारास फ्लोअर मिलमध्ये उतरवून तेथील स्टॉक रजिस्टर सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असलेल्या जयसिंगपूर विकास सोसायटीच्या शिधावाटप दुकानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र.४/२०२२ दाखल करण्यात येऊन दुकानाचे सेल्समन व वाहनचालक अशा दोन व्यक्तींना अटक करण्यात येऊन संबंधित वाहन जप्त करण्यात आले आहे.

जयसिंगपूर विकास सेवा सोसायटी या संस्थेच्या रास्तभाव धान्य दुकान क्र.-२, ३, व ५ यांच्या तपासणीमध्ये प्रत्यक्ष शिल्लकीपेक्षा जादा गहू व तांदूळ आढळून आल्याने त्या दुकानांची १०० टक्के अनामत रक्कम जप्त करून या तीनही दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वयंपाकगृह उपकरण संच पुरवठा करण्याबाबत

**(२५) * ४२१५९ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वयंपाकगृह उपकरण संच पुरवठा करण्याबाबत दिनांक ३० मार्च, २०१९ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: नांदुरा, मलकापूर, बुलढाणा व अमरावती जिल्हयातील पूरव प्राथमिक व प्राथमिक शाळांना अद्यापपर्यंत पुरवठा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुरवठादार कंपनीने तीन महिन्यांमध्ये राज्यातील प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळांना उपकरण संच पुरवठा करणे बंधनकारक होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपकरण संच विहित मुदतीमध्ये पुरवठा करणे आवश्यक असताना विहित मुदतीमध्ये पुरवठा न केल्यामुळे पुरवठादार कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) स्वयंपाकगृह उपकरण संच पुरवठा करण्याबाबत दि.३० मार्च, २०२१ व सुधारित आदेश दि.१४ जून, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) संचालनालयाच्या सुधारित वितरण आदेशानुसार स्वयंपाकगृह उपकरण संच पुरवठा विहित मुदतीमध्ये करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेहकर (जि.बुलढाणा) येथील पुरवठा विभागातील कर्मचारी विभक्त रेशनकार्ड देण्याकरिता पैसे घेत असल्याबाबत

**(२६) * ४१४४४ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथील पुरवठा विभागातील कर्मचारी विभक्त रेशनकार्ड देण्याकरिता पैसे घेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रेशनकार्ड मिळण्याकरिता पैसे घेणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे नाही, मेहकर जि. बुलढाणा येथील पुरवठा विभागाचे कर्मचारी विभक्त रेशनकार्ड मिळण्याकरीता पैसे घेत असल्यासंदर्भातील तक्रार माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान क्षेत्रीय कार्यालयास तसेच शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये जुन्या वाहतूक ठेकेदारांनाच पुन्हा वाहतुकीचे कंत्राट देण्यात आल्याबाबत

**(२७) * ३७९९४ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बहुतांश जिल्ह्यांमध्ये गत ५ वर्षापासून कार्यरत वाहतूक

ठेकेदारांनाच ९०० कोटींच्या वाहतूक निविदांचे पुढील तीन वर्षाची कंत्राटे प्रदान करण्यासाठी हेतुपुरस्सर लादलेल्या जाचक अटी व शर्तींची उच्चस्तरीय चौकशी करुन सदर जाचक अटी रद्द करणेबाबत विधानसभा सदस्य खामगाव यांनी मा.अन्न नागरी पुरवठा मंत्री यांना त्यांचे पत्र क्रमांक विसस/एब४/२०२१/४१ दिनांक २५ मे,२०२१ रोजीच्या पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी सुरु असतानाच चढ्या दराने सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कंत्राट वाटप करण्यात आले असून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाहतूक कंत्राट निविदा प्रक्रियांमध्ये प्राप्त झालेले न्यूनतम दर आधारभूत दरापेक्षा जास्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी उच्चस्तरिय चौकशी सुरू नसून शासन निर्णय दि.१५ जानेवारी, २०२१ नुसार कार्यान्वित करण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेमध्ये काही जिल्हयांसाठी न्युनतम निविदाकारांसोबत करारनामा करणेबाबत संबंधित जिल्हाधिकारी/नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांना दि.२४ डिसेंबर, २०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) दि.२० एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या प्रति क्विंटल आधारभूत दरांमध्ये सन २०१७ ते सन २०२० या कालावधीत झालेली घाऊक किंमत निर्देशांकातील वाढ व हमाली दरातील वाढ या बाबी विचारात घेऊन अत्यंत पारदर्शक पध्दतीने नवीन वाहतूक कंत्राटासाठीचे प्रति क्विंटल आधारभूत दर १) मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रातील ५ परिमंडळातील थेट वाहतूकीसाठी आणि २) जिल्हास्तरावरील सर्व महानगरपालिका, नगरपालिका/परिषदा व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणची थेट वाहतूक व उर्वरीत ग्रामीण भागातील दोन टप्प्यांची वाहतूकीसाठी प्रति क्विंटल दर विहित करण्यात आले आहेत.

शासनाने निर्धारित केलेल्या आधारभूत दरांस वित्त विभागाची तसेच मा. मंत्रीमंडळाची मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यता मिळाल्यापासून घाऊक किंमत निर्देशांकात व विशेषत: डिझेल तेलाच्या दरांमध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन अत्यंत पारदर्शक पध्दतीने नवीन वाहतूक कंत्राटासाठीचे प्रति क्विंटल दर अंतिम करण्यात आलेले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसमत (जि. हिंगोली) येथील MPSC-UPSC परीक्षांची पुर्वतयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * ३९९७८ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (MPSC -UPSC) स्पर्धात्मक परिक्षांची पुर्वतयारी करण्यासाठी वसमत (जि. हिंगोली) येथे प्रशिक्षण केंद्र, योग्य मार्गदर्शन व आवश्यक ते साहित्य उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षांपासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे सर्व सुविधांयुक्त प्रशिक्षण केंद्र तसेच प्रशिक्षकांची नेमणूक करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाने सदरहू प्रशिक्षण केंद्राच्या कामाकरिता १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पालक मंत्री व मा. शिक्षणमंत्री यांचेकडे दिनांक ६ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत शासकीय मार्गदर्शन केंद्र, अभ्यासवर्ग इत्यादी प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत.

केंद्रीय लोकसेवा अयोगाच्या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन उपलब्धकरुन देण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत राज्य

प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय पुर्व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक व कोल्हापूर या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र सुरु आहेत.

हिंगोली येथे प्रशिक्षण केंद्र अस्तित्वात नाही. प्रशिक्षण केंद्रांमध्ये योग्य मार्गदर्शन व आवश्यक ते साहित्य उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षांपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत कोणतीही तक्रार / निवेदन शासनाकडे प्राप्त झाले नाही.

(२) वसमत (जि.हिंगोली) येथे सर्व सुविधांयुक्त प्रशिक्षण केंद्र तसेच प्रशिक्षकांची नेमणूक करण्याबाबत कोणताही प्रस्ताव वा निवेदन शासनाकडे प्राप्त नाही.

(३) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचेकडे अशा प्रकारचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आर्थिकदृष्टया मागास घटकातील व्यावसायिकांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९) * ४१९४३ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली)** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिकदृष्टया मागास घटकातील व्यावसायिकांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत कर्ज उपलब्ध करुन दिले जाते त्या पात्र लाभार्थ्यांच्या व्याज परताव्याचा भरणा शासन नियमित करीत आहे मात्र महामंडळाने पाठवलेले शेकडो प्रस्ताव बँकेत पडून असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे व्यवसाय उभे करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या बेरोजगारांना आर्थिक अडचण निर्माण होवून त्यांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाने बँकेकडे पाठवलेले शेकडो प्रस्ताव वेळेत मंजुर न केल्याने बँकांना देण्यात आलेले उद्दीष्ट चालू आर्थिक वर्षांत पूर्ण न करणाऱ्या बँकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे खरे नाही.

महामंडळ लाभार्थ्यांच्या कर्जावरील मात्र व्याज परतावा करीत असल्याकारणाने, बँक कर्ज मंजुरीच्या प्रक्रीयेमध्ये कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप किंवा शिफारस करीत नाही. महामंडळामार्फत कोणतेही कर्ज प्रस्ताव बँकेकडे पाठविले जात नाहीत. तरी देखील राज्यातील बँकांनी महामंडळाच्या वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत (IR-I) आजपर्यंत ३७,७८२ लाभार्थ्यांना २४३८ कोटीचे कर्ज वितरीत केले आहे.

(२) हे खरे नाही.

महामंडळाकडे व्याज परताव्याकरीता प्राप्त होणाऱ्या प्रकरणांना विहित वेळेमध्ये व्याज परताव्याचा लाभ देण्यात येत आहे. महामंडळाने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रु. ९८.१२ कोटीचे आर्थिक सहाय्य व्याज परताव्यापोटी अदा केले आहे. याबाबतची सविस्तर आकडेवारी पुरक माहितीमध्ये जोडण्यात येत आहे.

(३) कर्ज मंजूरीची प्रक्रीया बँकेच्या स्तरावरील असल्याने बँक त्यांच्या व RBI च्या नियमांच्या अधीन राहून कर्ज मंजूरी देत आहे. त्यामुळे बँके विरूध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय योजनेचा लाभ मिळणेबाबत

**(३०) * ४२३१५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमानुसार अंत्योदय शिधापत्रिका फक्त निराधार व दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना देण्यात येते मात्र राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत पात्र असणाऱ्या सर्व दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय योजनेत समाविष्ट करणे आवश्यक असतांनाही शहापूर तालुक्यातील (जि. ठाणे) दिव्यांग बांधवांना अंत्योदय योजनेत समाविष्ट न केल्यामुळे ते लाभापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत पात्र असणाऱ्या सर्व दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय योजनेत समाविष्ट करण्यात शहापूर पुरवठा विभागाकडून शिधापत्रिका देण्यात आल्या होत्या परंतु काही दिवसातच जिल्हयाचा इष्टांक संपला असल्याने अंत्योदय शिधापत्रिका देण्याचे काम बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन अंत्योदय शिधापत्रिकांसाठी नवीन अर्ज स्वीकारणे बंद केल्यामुळे दिव्यांग बांधवांना घरकुल तसेच संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहापूर तालुक्यात जवळपास सुमारे २५०० हून अधिक दिव्यांगांपैकी केवळ १७ दिव्यांगांना अंत्योदय शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आल्याने बहुतांश दिव्यांग बांधवावर अन्याय झाला असल्याचे सविस्तर निवेदन नायब तहसिलदार, श्री.डी.के.वळवी यांना बहुउद्देशीय संस्थेचे विश्वस्त श्री.घावट यांनी माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवडयात सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत दिव्यांग क्रीडा जिल्हा प्रमुख श्री. सचिन सातवी यांनीही दिव्यांग बांधवावर होत असलेल्या अन्यायाबाबत खंत व्यक्तकेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दिव्यांग बांधवांवर होणारा अन्याय दूर करुन त्यांना अंत्योदय शिधापत्रिका देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) व (३) हे खरे नाही,

(४) अंशत: खरे आहे, शहापूर तालुक्यात दिव्यांग व्यक्तींचे शिधापत्रिकेसाठी प्राप्त २७ अर्जापैकी १७ दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय अन्न योजनेच्या पिवळया शिधापत्रिका वितरित करून अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरीत १० दिव्यांग व्यक्तींच्या अंत्योदय योजनेच्या पिवळ्या शिधापत्रीकेची RCMS प्रणालीमध्ये ऑनलाईन नोंद करुन शिधापत्रिका वितरीत करणेत आलेल्या आहेत. ई-पॉस मशिनवर पुढील महिन्यामध्ये डाटा उपलब्ध झाल्यानंतर त्यांनाही धान्याचा लाभ मिळणार आहे.तहसिलदार कार्यालय,

शहापूर यांचेकडून अद्यापपर्यंत दिव्यांग व्यक्तींना शिधापत्रिका मिळणेपासून वंचित ठेवण्यात आलेले नसून  दिव्यांग व्यक्तींना शिधापत्रिका देण्याबाबत एकही अर्ज तहसिलदार कार्यालय, शहापूर यांचेकडे प्रलंबित नाही.

(५) हे खरे नाही

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणामध्ये जलप्रदूषण होत असल्याबाबत

**(३१)* ४२०९९ श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर-उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)  उजनी जलाशयात (जि.सोलापूर) पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातून येणाऱ्या दुषित पाण्यामुळे धरणातील पाणी प्रदुषित झाले असल्याने नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उजनी धरणाच्या पाण्याची गुणवत्ता वेळोवेळी तपासली जाते. त्यानूसार उजनी धरणातील पाण्यात रासायनिक पदार्थ मिश्रीत होत असल्याचे आढळून येत नाही. तथापि, सदर पाण्यामध्ये घरगुती सांडपाण्याशी निगडीत मानके जसे की, टोटल कॉलिफॉर्म व फिकल कॉलिफॉर्म विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळून आले आहेत.

• मुळा-मुठा नदी व त्याच्या उपनद्यांच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ कलम-४१अन्वये पुणे महानगरपालिकेची रु.१५ करोड इतकी रक्कम गोठविण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुणे महानगरपालिकेला जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये दिनांक २९/१०/२०२१ रोजी आदेश देण्यात आले आहेत.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अप्रक्रीयाकृत सांडपाण्यावर प्रक्रीया करण्याकरीता मैला शुध्दीकरण प्रक्रीया संयंत्रणा उभारण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला दिनांक ०९/१२/२०१९, दिनांक १५/०१/२०२० व दिनांक २९/१०/२०२१ रोजी प्रस्तावित आदेश बजावण्यात आले आहेत. तसेच सदर महानगरपालिकेविरुध्द जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये फौजदारी खटला आर.सी.सी. नं. १४४/२००० व आर.सी.सी. नं. ७०९/२०१६ व नुकताच दावा आर.सी.सी. नं.३१६८/२०२० अन्वये मा. मुख्य दंडाधिकारी पुणे यांच्या न्यायालयात दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोडी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे भेसळयुक्त पनीर जप्त केल्याबाबत

**(३२) * ३७७८४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोडे (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील मेसर्स आर्या डेअरी कॉर्पोरेशनवर ठाणे अन्न औषध प्रशासनाने छापा टाकून सुमारे ६५० किलो भेसळयुक्त पनीरचा साठा जप्त केल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न औषध प्रशासन विभागाने येथील पामोलिन तेल, पनीर आणि असेटिक ॲसिडचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी भेसळ करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) व (२) खरे आहे.

(३) दि. २०.०१.२०२२ रोजी मे.आर्या कॉर्पोरेशन, तळमजला, परशुराम तबेला, अंजुर भिवंडी रोड, विद्या वजन काट्याजवळ दापोडे ता.भिवंडी, जि.ठाणे या आस्थापनेच्या मालकाविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, ठाणे येथे भा.द.वि. १८६०, कलम २७२, २७३ व ४२० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील अशिक्षित, निराधार व विधवा महिलांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांच्या रेशनकार्डांमध्ये परप्रांतीयांची नावे टाकण्यात येत असल्याबाबत

**(३३) * ३८५६७ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर चारकोप) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अशिक्षित, निराधार व विधवा महिलांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन जुने फाटलेले रेशनकार्ड बदलून देण्याच्या बहाण्याने काही व्यक्ती रेशनकार्डमध्ये परप्रांतियांची नावे टाकत असल्याबाबतची तक्रार पालघर जिल्हयातील वसई येथील आदिवासी एकता परिषदेने तहसिलदारांकडे केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुरवठा अधिका-यांच्या संगनमताने असे प्रकार केले जात असल्यास सदरहू अधिका-यांना निलंबित करून सर्व संबंधीतांविरुध्द शासनाकडून कारवाई करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) आदिवासी एकता परिषदेचे अध्यक्ष यांनी एकटया महिले संदर्भात तहसील कार्यालय, वसई यांचेकडे सादर केलेल्या तक्रार अर्जामध्ये परप्रांतीयांची नावे टाकणेबाबत कुठल्याही प्रकारचा उल्लेख केलेला नाही. तसेच परप्रांतीयांची नावे रेशनकार्डमध्ये टाकली जातात अशा स्वरूपाची लेखी अथवा तोंडी तक्रार तहसील कार्यालय, वसई यांचेकडे अद्यापपर्यंत कुणीही केल्याचे निर्दशनास आलेले नाही. तक्रार अर्जाच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाकडून सुनावण्या आयोजित करण्यात आल्या होत्या. शिधापत्रिकेतील नाव कमी करून अन्य व्यक्तीचे नाव टाकण्याची कार्यवाही क्षेत्रीय कार्यालयामार्फत झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील समुद्र किनारा सागरी पर्यटनाच्या सुविधांपासुन वंचित असल्याबाबत

**(३४) * ४११५४ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील १२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा हा सागरी पर्यटनासाठी प्रसिद्ध असल्याने येथील चौपाट्या आणि सुरूच्या बागांमुळे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असल्याने येथील पर्यटन विकासासाठी कोट्यवधी रुपयांचे आश्वासन अनेक मंत्री महोदयांनी देऊनही पर्यटनाबाबतच्या मुलभूत सुविधांपासून या चौपाट्या वंचित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई, पालघर, डहाणू व तलासरी तालुक्यांतील झाई ही सागरी पर्यटनस्थळे प्रसिद्ध असून येथील जैवविविधता, हिरवाई, देवस्थान, माशांची उपलब्धता आणि खाद्य संस्कृती प्रसिद्ध असल्याने देशी-विदेशी पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात येत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पर्यटनस्थळांना मुलभूत सोयी- सुविधा पुरवून शासनाच्या महसूलात वाढ होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) नाही.
(२) होय.
(३) पालघर जिल्हयातील समुद्र किनाऱ्यांच्या विकासासाठी बीच शॅक धोरणांतर्गत केळवा व बोर्डी या दोन ठिकाणी बीच शॅक उभारणीस मंजुरी देण्यात आली आहे.

डहाणू येथील विकास कामांसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत रु.७९७.७४ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रु.२६१.०० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत डहाणू येथील

विकास कामांसाठी रु.४४.३० लक्षच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे. प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत माहिम, शिरगांव, केळवा,मुरबे,उनभाट, कोकणेर येथील समुद्र किनाऱ्यावर पर्यटन विकासासाठी रु.१३७.०० लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रु.८३.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत चिंचणी येथे पर्यटक निवास व संरक्षक भति या कामासाठी रु.८३.४४ लक्षच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देऊन रु.६८.४४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत झाई, ता. तलासरी येथील विकास कामांसाठी रु.१४०.५० लक्षच्या, केळवे येथील कामासाठी रु.२१.३६ लक्षच्या, निर्मळ-कळंब येथील कामासाठी रु.६२.५० लक्षच्या तर माहिम येथील कामासाठी रु.२५.०० लक्षच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

केळवा, माहिम, शिरगांव, नांदगांव, बोर्डी, अर्नाळा येथे कोकण ग्रामीण पर्यटन विकास योजनेअंतर्गत सुशोभिकरण, बैठक व्यवस्था, समुद्राकडे जाणारा पोहोच रस्ता, विद्युत दिवे, हायमास्ट, बायोटॉलेट, चेंजिग रुम इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील अतिरिक्त शिक्षकांबाबत

**(३५) * ४२२३८ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील शाळा व महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या पहिली ते बारावीच्या एकूण ८ लाख ७९ हजार ८०२ विद्यार्थांपैकी अद्याप ६१ हजार ९१० विद्यार्थी सरल प्रणालीवर आधार कार्ड नोंदणीविनाच असून आधार कार्डची सरल प्रणालीत नोंदणी झालेली विद्यार्थी पटसंख्याच शिक्षक संच मान्यतेसाठी ग्राहय मानली जाईल असे धोरण शालेय शिक्षण विभागाने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात ६२ हजार विद्यार्थांचे आधारकार्ड नोंदणी सरल प्रणालीत झाली नसल्याने अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील खाजगी शाळांमध्ये २४ लाख विद्यार्थी बोगस

असल्याचा दावा मा.उच्च न्यायालयात करण्यात आला असून नांदेड, बीड जिल्हयात प्रत्येकी १६ हजार विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची दुबार नोंदणी झाल्याची आकडेवारी याचिकाकर्त्यांने सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नांदेड जिल्हयात सरल प्रणाली अंतर्गत पहिली ते बारावीच्या वर्गात ४५ हजार विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक पडताळणीत बोगस असून व ११० शिक्षक अतिरिक्त आहेत हे खरे आहे काय,

(५) असल्यास, कोरोना महामारीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधार केंद्रावर येणे शक्य नसल्याने तसेच एस.टी.च्या संपामुळे विद्यार्थ्यांची प्रवासाची गैरसोय, पालकांचा अनुत्साह, तसेच आधार कार्डमधील नावाच्या स्पेलींग चुका,जन्म तारीख पुर्ण नसणे, टोपण नावाची नोंदणी, बोटांचे ठसे न जुळणे, यामुळे आधार कार्डतील मजकुर सरल प्रणालीमध्ये मिसमॅचींग दोष येणे या कारणामुळे ही नोंदणी होत नसल्याने आधार कार्डची सरल प्रणालीमध्ये नोंदणी होण्यासाठी सुधारणा करुन सरल प्रणाली नोंदणी कालावधी वाढवून देण्यात येणार आहे काय,

(६) असल्यास, राज्यात सन २०१२ मध्ये राबविण्यात आलेल्या पटपडताळणी मोहिमेत दोषी आढळलेल्या २२ जिल्हयांमधील २८२ शाळांकडून ४ कोटी १४ लाख ६४ हजार २०८ रुपये वसुल करण्याचे आदेश शिक्षण संचालकांनी माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या सुमारास दिले असून आतापर्यंत कोणत्या जिल्हयातील कोणत्या शाळांकडून वसुली करण्यात आली आहे व उर्वरित शाळांकडून कधीपर्यंत वसुली करण्यात येणार आहे,

(७) असल्यास, बोगस विद्यार्थी दाखवून त्याचा फायदा घेणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

(५) या संदर्भात शासन पत्र दि.२८/०२/२०२२ अन्वये विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक सरल पोर्टलवर नोंदणी करण्याकरिता दि.३१/०३/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तसेच, आयुक्त शिक्षण यांना योग्य ती उपाययोजना निश्चित करून आधार नोंदणीची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(६) व (७) हे अंशत: खरे आहे.

वसूल पात्र रकमेच्या वसूलीची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.

-----------------

## कल्याण ग्रामीण परिसरातील उत्तरशिव नदीपात्रात होत असलेल्या जलप्रदुषणाबाबत

**(३६) * ४२२६२ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण ग्रामीण भागातील १४ गावांमधून वाहणाऱ्या उत्तर शिव नदीला मागील दोन वर्षापासून प्रदूषणाने ग्रासले असून कंपन्यांमधील रसायन थेट नदीत सोडल्यामुळे पाण्याला दर दिवशी वेगवेगळे रंग प्राप्त होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही रसायन हे माळरानावर जाळले जात असल्यामुळे या चौदा गावांवर रसायनमिश्रित ढग आढळून येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदी मध्ये रसायन मिसळत असल्याने जलचरांचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. तसेच नदीवर जनावरेही पाणी पिण्यासाठी जात असल्याने त्यांच्याही जिवास धोका निर्माण झाला आहे. तसेच नदीकाठावर पालेभाज्या उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनाही याचा त्रास जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील दोन वर्षापासून प्रदूषण नियंत्रण महामंडळातर्फे कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्यामुळे दिवसेंदिवस प्रदूषणामध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे. सदर परिसरातील काही भंगार दुकानदारांकडून औद्योगिक वापरातून निघालेल्या गोण्या धुतल्यामुळे निर्माण झालेले सांडपाणी विनाप्रक्रिया नाल्यामध्ये मिसळल्याचे आढळून आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर परिसरामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी

करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान विना संमतीपत्र व विनाप्रक्रिया औद्योगिक सांडपाणी निर्माण करणाऱ्या १४ दोषी उद्योगांना दिनांक ०५/०४/२०२१, ३०/०८/२०२१ व दिनांक ०६/०९/२०२१ रोजी उद्योग बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील कारखान्यांमुळे प्रवरा नदीचे पाणी प्रदूषित होत असल्याबाबत

**(३७) * ३८२२३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यात प्रवरा नदीपात्रात अनेक वर्षापासून तेथील साखर कारखाने, दूध संघ, हॉटेल, दवाखाने तसेच नगरपरिषदेच्या माध्यमातून रसायनयुक्त पाणी नदीपात्रात सोडले जात असल्यामुळे प्रवरा नदीचे पाणी प्रदूषित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवरा नदीत सोडले जात असलेल्या रसायनयुक्त पाण्यामुळे जोर्वे, कोल्हेवाडी, कनकापूर, कनोली, मनोली या नदीपात्रा लगतच्या गांवात पाणी पुरवठा योजनांच्या विहिरी नदीपात्रातच असल्याने या प्रदूषित पाण्याचा पाझर थेट पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्यात येत असल्यामुळे गांवातील लोकांचे, शेतीचे आणि जनावराचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवरा नदी बचाव कृती समितीचे कार्यकते तसेच स्थानिकांनी नदीपात्रात सोडण्यात येणा-या प्रदूषित पाण्याच्या विरोधात वारंवार प्रांताधिकारी, पोलीस स्टेशन तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे निवेदने, तक्रारी देऊनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रवरा नदीपात्रात रसायनयुक्त प्रदूषित पाणी सोडणा-या साखर कारखाने, दूध संघ वा नगरपरिषद यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) • संगमनेर शहरातील घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया नाल्याद्वारे

प्रवरा नदीत मिसळत असल्याचे निदर्शनास आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संगमनेर नगरपरिषदेला घरगुती सांडपाणी यंत्रणा उभारणेबाबत व पर्यावरण नुकसान भरपाई का लादु नये याबाबत दिनांक २६/१०/२०२१ रोजी निर्देश दिले होते. तद्नंरत मा. लवादाकडे दाखल मूळ अर्ज क्र. ११०/२०१५ मध्ये मा. लवादाने दिनांक १५/०७/२०२० रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संगमनेर नगरपरिषदेला पर्यावरण नुकसान भरपाई म्हणून रु. ५.४० कोटी इतकी रक्कम जमा करण्याबाबत जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ (अ) व पर्यावरण (सुरक्षा) कायदा, १९८६ अंतर्गत दिनांक ०२/०३/२०२२ रोजी निर्देश देण्यात आले आहेत.

• प्रवरा नदीच्या प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक ०८/१२/२०२१ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १४/१२/२०२१ रोजी केलेल्या पाहणी दरम्यान मे. संगमनेर तालुका दुध उत्पादक सहकारी संघाच्या डेअरी मधुन पांढऱ्या रंगाच्या पाण्याचा विसर्ग काही प्रमाणात कारखाना परिसराबाहेर चेंबरमध्ये होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २२/१२/२०२१ रोजी प्रस्तावित निर्देश दिले आहेत. त्यानूसार सदर उद्योगाची रु. २.५ लक्ष इतकी बँक हमी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जप्त केली असून सदर उद्योगाची सुनावणी प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण शहरातील (जि.औरंगाबाद) वक्फ बोर्डाच्या मालमत्तेची विक्री होत असल्याबाबत

**(३८) * ४११५५ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पैठण शहरातील (जि.औरंगाबाद) वक्फ बोर्डाच्या मालमत्तेची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमाम मौलाना साहेब दर्ग्याची सर्वे नं. १७३ ही अत्यंत मोक्याची जमीन असून अत्यंत अल्प किंमतीत विकली गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनीचे सध्याच्या बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन करून वक्फ

बोर्डाला महसूल मिळवून देण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक :** (१) होय.
(२) अशंत: खरे आहे. वक्फ मंडळाकडे नोंदणी झालेल्या दर्गाह हजरत मौलाना साहेब पैठण, ता.पैठण, जि.औरंगाबाद या वक्फ संस्थेची पैठण येथील सर्वे नं.१७३ येथे २८ एकर ३८ गुंठे इनाम जमीन आहे. सदर वक्फ मालमत्तेची खरेदी विक्री सुरु असल्याची बाब वक्फ मंडळाच्या निदर्शनास आली होती. त्यास अनुसरुन वक्फ मंडळाने सदर खरेदी विक्री थांबविली असून दर्गाहच्या जमीनीची खरेदी विक्री करणाऱ्या लोकांविरुध्द पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ नुसार सदर मालमत्तेवरील अतिक्रमण काढण्याबाबत वक्फ मंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) सदर वक्फ जमीनीवरील अतिक्रमण हटविल्यानंतर वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियमानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे किरवली (ता.कर्जत, जि.रायगड) येथील नळ पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(३९) * ४२२६३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे किरवली (ता.कर्जत, जि.रायगड) येथील गावासाठी सतरा वर्षांपूर्वी सुरु केलेली नळ पाणी पुरवठा योजना गत सहा महिन्यांपासून बंद पडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या विहिरीमधून नळ पाणी पुरवठा करण्यात येतो त्या विहिरीची

माहे जुलै, २०२१ मध्ये झालेल्या जोरदार पावसात पडझड होऊन ती कोसळली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नळ पाणी पुरवठा योजना बंद झाल्यामुळे किरवली येथील महिलांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलजीवन मिशनच्या माध्यमातून किंवा अन्य माध्यमातून किरवली गावातील पाण्याची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) उद्भव विहीरीचा नदीकडील बांधकामाचा अशंतः भाग पडला होता, ग्रामपंचायत किरवली मार्फत त्याची दुरुस्ती करणेत आली आहे. दरम्यान,किरवली गावामध्ये दोन स्वतंत्र विधन विहीरीवरुनही पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच किरवलीमध्ये वैयक्तीक मालकीच्या विधन विहीरीही आहेत. त्याव्दारे ग्रामस्थांना पाणी पुरवठा होत आहे. सद्य:स्थितीत नळ पाणी पुरवठा योजनेचे पाणी सुरळीत सुरु आहे. केंद्र व राज्य शासनाचे जल जीवन मिशन अंतर्गत कृती आराखडा सन २०२१-२२ मध्ये सदर गावाचा समावेश केला असून सदर गाव पाली भुतीवली आसल धरणाचे उदभवावरील प्रस्तावित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेमध्ये समावेश करणेत आलेला आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.